# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

**दि.12.07.2022 रोजी संपन्न झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद बैठकिचे इतिवृत्त**

दि.12.07.2022 रोजी मा.प्रशासक तथा आयुक्त् महानगरपालिका औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्यालयात वृक्ष प्राधिकरण समितीची बैठक संपन्न झाली. सदर बैठकिस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा.श्री.अस्तिक कुमार पाण्डेय | — | आयुक्त् तथा प्रशासक |
| मा.श्री.दिलीप यार्दी | - | वृक्ष प्राधिकारण सदस्य/ वन्यजीव सदस्य |
| मा.श्री.रवी चौधरी | - | प्रयास युथ फाउडेशन |
| मा.श्री.जनार्धन भडके | - | वृक्ष प्राधीकरण समिती सदस्य |

सर्व प्रथम श्री.विजय पाटील, वृक्ष अधिकारी यांनी बैठकिस आलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत केले. तसेच हिमायत बाग प्रशासन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ यांनी हिमायत बाग परीसरातील जुने पुरातन वृक्ष हे Heritage Tree गणना करणे बाबत दिलेल्या प्रस्ताव यावर सविस्तर माहिती दिली.

वृक्ष अधिकारी :- मा.उच्च न्यायालयात, औरंगाबाद खंडपीठ जनहित याचिका क्र.63/2021 नुसार हिमायत बाग परीसरातील जुने पुरातन वृक्ष हे हेरीटेज वृक्ष गणना करणे व घोषित करणे असे अतंर्भुत आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपलिकेने व वन विभागाने दि. / /2022 रोजी संयुक्त् पाहणी करुन परीसरातील जुने पुरातन वृक्षांची गणना केली, वृक्ष प्रजाती, निहाय संख्या निश्चित करुन तसाअहवाल दि / /2022 रोजी उपवनसंरक्षक, वन विभाग यांना सादर केला आहे.

श्री.दिलीप यार्दी :- या परीसरात साधारणतः कोण कोणत्या प्रजाती आहेत व त्यांचे साधारण आयुष्यमान किती आहे?

वृक्ष अधिकारी :- हिमायत बाग परीसरात प्रामुख्याने चिंच, आंबा, कवठ, ई.भारतीयस वंशावळीची फळ वृक्षे आहेत व साधारणपणे या वृक्षांचे वय वन विभागाच्या अहवालानुसार 50 ते 100 वर्षापेक्षा जास्त आहे असे सांगितले.

रवि चौधरी :- वन विभागने जो अहवाल दिला तो सर्व समिती सदस्यांना दाखववावा.

वृक्ष अधिकारी :- वन विभागाकडुन प्राप्त अहवाल सर्व समिती सदस्यांना दाखविला व अहवाल तपासनी नंतर सर्वानी आपले मत नोंदविले

श्री.भडके :- हिमायत बाग परीसरातील वृक्ष हे पुरातन आहे. त्यांची गणना हेरीटेज वृक्षांमध्ये केली तर त्यांचे ऐतिहासिकदृष्ट्या संरक्षण व संवर्धन करता येईल.

श्री.दिलीप यार्दी :- परीसरातील वृक्ष हे हेरीटेज वृक्ष म्हणुन घोषित केले तर आपोआपच त्यांच्या संवर्धनाची जबाबदारी हि हिमायतबाग प्रशासनावर येईल व यामुळे ही वृक्ष कोणीही तोडु शकणार नाही. यामुळे पर्यावरणीय दृष्ट्या खुप चांगला परीणाम दिसणार आहे.

मा आयुक्त :- हिमायतबाग परीसरातील प्राप्त प्रस्तावानुसार तसेच जनहित याचिका क्रं.63/2021 चा विचार करता या परीसरात 50 ते 100 वर्ष पेक्षा जास्त् वयाची वृक्ष जे भारतीय वंशवळीचे (Native Trees) आहेत असे अहवालात नमूद आहे. त्याचा विचार करता व सर्व वृक्ष प्राधिकरण समिती सदस्यांच्या मताचा विचार करता हिमायत बाग परीसरातील जुने, पूरातन निजामकालीन वृक्षांना हेरीटेज वृक्ष म्हणून घोषित करण्यात काही हरकत नाही.

अशा प्रकारे सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपली.

निर्णय :- हिमायत बाग परीसरातील पुरातन, जुन्या वृक्षांना हेरीटेज वृक्ष म्हणून घोषित करण्यास मान्यता झाली.

**वृक्ष अधिकारी**
महानगरपालिका औरंगाबाद

**आस्तिक कुमार पाण्डेय** (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका औरंगाबाद